दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक ३३० • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.२४ फेब्रुवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# रोहा, तळा तालुका हद्दीतील खाडीपट्ट्यात महसूल विभागाची धडक कारवाई

## अवैध रेती उत्खनन व्यवसायिकांना इशारा



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रोहा, तळा तालुका हद्दीतील कांडणे खुर्द ठिकाणी अलीकडच्या काळात बाहेरील व्यक्तींकडून अवैध रेती उत्खनन व वाहतूक सुरू होती. स्थानिकांना रोजगार नाही, बाहेरचे रेती व्यावसायिक अवैध रेती उत्खनन करीत असल्याने सक्शन पंपावर जप्तीची कारवाई करावी, अशा तक्रारी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर तसेच रोहा प्रांताधिकारी डॉ.यशवंतराव माने यांच्याकडे प्राप्त झाल्या. यापूर्वी कुंडलिकेच्या खाडीपट्ट्यात महसूल विभागाने अवैध रेती उपसा करणाऱ्यांविरूद्ध धडक कारवाई केली होती.

आताही प्राप्त तक्रारींची तातडीने दखल घेवून, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रांताधिकारी डॉ.यशवंत माने यांच्या आदेशान्वये तहसिलदार कविता जाधव व त्यांच्या पथकाने सर्वात मोठी कारवाई केली. या पथकाने केलेल्या कारवाईत ४ सक्शन पंप, ७ होड्या जाळून नष्ट करण्यात आल्या. महसूल पथकाने कांडणे खुर्द, खाजणी खाडीपट्ट्यातील रेती उत्खनन यंत्रणेवर धडक कारवाई केल्याने बेकायदेशीर रेती उत्खनन करणाऱ्या व्यावसायिकांना अवैध गोष्टी थांबविण्याचा थेट इशाराच मिळाला आहे.

तळा मुख्यतः रोहा कुंडलिका, भालगाव खाडीपट्ट्यात गेल्या काही दिवसांपासून अवैध रेती उत्खनन व रात्री उशिरा अवैध रेती वाहतूक सुरू होती. विभागातील स्थानिकांना रोजगार नाही त्यातच बाहेरच्या व्यावसायिकांनी रेती उपसा सत्र सुरूच ठेवले होते. मात्र मंगळवारी सायंकाळी तहसिलदार कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी भरत गुंड, तलाठी श्री.राऊत, विशाल चोरगे यांनी खाजणी घटनास्थळी पाहणी केली अन् धडक कारवाईला सुरूवात केली. या कारवाईत त्यांना खाडीकिनारी ४ सक्शन पंप, ७ होड्या आढळून आल्या. ४ होड्यांमध्ये रेती होती. या पथकाने तातडीने पंचनामा करून ४ सक्शन पंप, ७ होड्या जाळून निकामी करून टाकल्या. कांडणे खुर्द, खाजणी खाडीपट्ट्यातील अवैध रेती उत्खननावर महसूल विभागाने प्रथमच ऐतिहासिक धडक कारवाई केली. होड्या, सक्शन पंप जाळण्याची कारवाई केल्याने सबंधितांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, अशा प्रकारे कोणत्याही प्रकारचे अवैध व्यवसाय सुरू ठेवता येणार नाहीत, असा सज्जड इशारा प्रांताधिकारी डॉ.यशवंतराव माने यांनी अवैध धंदे करणाऱ्यांना दिला आहे.

# पनवेलमधील समस्यांची सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून पाहणी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १९ मध्ये ठिकठिकाणी असलेल्या गटारांमध्ये पाणी साचण्याची समसम्या नागरिकांना भेटसावत होती. त्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या समस्यांची मंगळवारी पाहणी करून अधिकार्यांना आश्वयक त्या सूचना दिल्या तसेच दांडेकर हॉस्पीटल समोर उभारण्यात येत असलेल्या शाळेच्या कामाची पाहणी केली.

पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या माध्यमातून नागरिकांना भेडसवणार्या समस्या जाणून त्या सोडवण्याचे काम करत आहेत. त्यानुसार प्रभाग क्रमांक १९ मधील एस.टी.स्टँड, उरण नाका, मिडल क्लास हौसिंग सोसायटी मधील गटारे तुंबण्याची समस्या नागरिकांना भेडसावत होती. त्या पार्श्वभुमीवर सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या गटारांची पाहणी करुन अधिकार्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या तसेच दांडेकर हॉस्पिटल समोर महापालिकेमार्फत कन्या शाळा, सरस्वती विद्या मंदीर, दगडी शाळा या एकत्रितपणे उभारण्यात येत आहे. या शाळेचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या कामाची पाहणीही केली. या वेळी प्रभाग समिती 'ड'च्या सभापती अ‍ॅड. वृषाली वाघमारे, नगरसेवक अनिल भगत, नगरसेविका रुचिता लोंढे, भाजप नेते अ‍ॅड. जितेंद्र वाघमारे, शहर अभियंता संदीप कटेकर, श्री. साळुंखे, आरोग्य विभागाचे संजय जाधव, यतिन देशमुख यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# महानगरपालिका व नगरपालिकामधील सफाई कामगारांच्या वारसा हक्काचा प्रश्न मार्गी लागणार : ना.धनंजय मुंडे

## लाड-पागे समितीच्या शासन निर्णयात सुधारणा करणार



**दै.रायगड नगरी । मुंबई**

सफाई कामगारांच्या प्रश्नांबाबत सफाई कामगारांच्या विविध संघटनांच्या मागण्या व महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाने शिफारशी केलेल्या आहेत. लाड पागे समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत आतापर्यंत शासनाच्या विविध विभागांनी सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबत काढलेले सर्व शासननिर्णय एकत्र करून सुधारीत शासननिर्णयाचा प्रस्ताव मंत्रीमंडळात प्रस्ताव सादर करण्यात येईल, असे सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी बैठकीत सांगितले.

मंत्रालयातील दालनात लाड-पागे समितीच्या शासननिर्णयात सुधारणा करण्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे बोलत होते. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अपर मुख्य सचिव जयश्री मुखर्जी, दूरदृश्यप्रणालीव्दारे, समाजकल्याण आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे, सफाई कामगार नेते गोविंदभाई परमार, सुभाष मालपानी, शकील मुजावर यावेळी उपस्थित होते.

सामाजिक न्यायमंत्री श्री.मुंडे म्हणाले, सामाजिक न्याय विभागाच्या २०१६ रोजीच्या शासननिर्णयानुसार फक्त वाल्मिकी मेहेतर व इतर अनुसूचितजाती मधील सफाई कर्मचारी यांना वारसा हक्क लागू होता. इतर सर्व जातीच्या सफाई कर्मचारी यांनाही न्याय मिळणे गरजेचे आहे. त्यामध्ये बदल करून सर्वच जातीच्या सफाई कर्मचारी यांना वारसा हक्क लागू करणे, यासह सफाई कामगारांच्या प्रश्नांबाबत सफाई कामगारांच्या विविध संघटनांच्या मागण्या व महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोग यांनी केलेल्या शिफारशींचाही विचार .../२

# परदेशातून आलेल्या मालाचा अपहार करणाऱ्या टोळीस पोलिसांकडून अटक




**दै.रायगड नगरी । पनवेल**

परदेशातून आलेल्या मालाचा अपहार करणाऱ्या टोळीस पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्या अटकेमुळे मोठ्या प्रमाणात परदेशी मालाच्या अपहार प्रकरणाचा खुलासा होणार आहे.

पनवेल शहर पोलीस ठाणे येथे तक्रारदार विश्वनाथ दत्तात्रय पाटील, वय ५० वर्षे, रा. चिंचवड, पुणे यांनी फिर्याद दिली की, त्यांच्या एल्काय कंपनीने चीन या देशातून मागविलेले आरएस-६०२ या नावाच्या केमिकलचे ४४ बॅरल व एचएमएस-२४० बी या नावाच्या केमिकलचे ८० बॅरल हे एलसीएल लॉजिस्टीक इंडिया प्रा.लि. शिरढोण, ता. पनवेल या कंपनीच्या गोडाउनमध्ये ठेवले होते. यातील गोडाऊनचे मॅनेजर- आरोपी भरत उंडे (३५रा. कळंबोली, पनवेल) व इतर एक आरोपी यांनी आपसात संगणमत करुन स्वत: च्या आर्थिक फायद्याकरिता फिर्यादीचा विश्वासघात करुन वरील बॅरेल परस्पर भिवंडी येथे विक्री केली व फिर्यादीच्या बॅरल मध्ये पाणी भरुन एल्काय कंपनीची रुपये १,१३,३७,४१९/- ची फसवणुक करुन विश्वासघात केला म्हणुन पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा गुन्हा दाखल केला आहे. .../२

## संक्षिप्त...

### नवाब मलिकांना ३ मार्चपर्यंत ईडी कोठडी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आणि राज्याचे अल्पसंख्याक विकास मंत्री नवाब मलिक यांना न्यायालयाने ३ मार्च पर्यंत ईडी कोठडी ठोठावली आहे. विशेष न्यायाधीश राहुल रोकडे यांनी ही ८ दिवसांची ईडी कोठडी सुनावली. ईडीने न्यायालयाकडे १४ दिवसांची ईडी कोठडीची मागणी केली होती. नवाब मलिक यांना अंडरवर्ल्डशी संबंध आणि मनी लाँड्रिंग्प्रकरणी अंमलबजावणी संचलनालयाकडून (ईडी) यांना अटक करण्यात आली आहे. अटकेपूर्वी ईडीने मलिक यांची तब्बल सात तास चौकशी केली. अडरवर्ल्डशी संबंध आणि मनी लाँड्रिंगशी संबधित प्रकरणात ईडीने आज बुधवारी मोठी कारवाई करत अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांना सात तासांच्या चौकशीनंतर अटक केली. ईडीने सकाळी ७ वाजता मलिक यांच्या घरी छापा टाकला होता. राष्ट्रीय तपास संस्थेच्या एफआयआरच्याआधारे सुरू असलेल्या तपासाअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. दाऊदचा भाचा अलिशाह पारकर व छोटा शकीलचा माणूस सलीम फ्रुटच्या जबानीनुसार मलिक यांना अटक केल्याची ईडीच्या सूत्रांनी माहिती दिली.

# राज्य सरकारी कर्मचारी दोन दिवसाच्या संपावर ; खालापूर तहसील कार्यालय शुकशुकाट



**दै.रायगड नगरी । खोपोली**

आपल्या विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी आज दि. २३ फेब्रुवारीपासून दोन दिवसांचासंप पुकारला आहे. कर्मचारी संपावर गेल्याने खालापूर तहसीलमध्ये आज दिवसभर शांतता असून शुक शुकाट दिसून आला होता . खालापूर तहसीलमधील ६५ कर्मचारी संपात सहभागी झाले. नवीन पेन्शन योजना रद्द करून जुनी पेन्शन योजना पद्धत पूर्ववत करावी तसेच विविध मागणी सरकारी कर्मचाऱ्यांकडून होत आहे. त्याचबरोबर रिक्त पदांवर भरती करण्यात यावी, ब्रिटीशकालीन पदे आजही कायम आहेत, या सर्व मागण्यांसाठी सरकारी कर्मचारी संपावर गेले आहेत.

राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यानी १. नविन पेन्शन योजना (छ्झड) रद्द करून सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करा तसेच मध्यंतरीच्या काळात केंद्रीय NPS कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या सर्व सुविधा तत्काळ राज्यात लागू करा. २. किमान पेन्शन मध्ये केंद्रासमान उचीत वाढ़ करा.३. सर्वांना समान किमान वेतन देऊन, कंत्राटी व योजना कामगार (आंगणवाडी, आशा वर्कर्स,महिला परिचर इ.) यांच्या सेवा नियमित करा.४. शासकीय विभागात कोणत्याही स्वरुपाच्या खाजगीकरण/ कंत्राटीकरणास सक्तविरोध.५. बक्षी समिती अहवालाचा खंड-२ प्रसिध्द करा. (लिपिक व इतर संवर्गीय वेतन त्रूटी) ६. सर्व रिक्त पदे तत्काळ भरा. (आरोग्य विभागास अग्रक्रम द्या.)७. सर्व भत्ते केंद्रासमान द्या. (वाहतूक, शैक्षणिक भत्ता व इतर भत्ते) ८. अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या विनाशर्त करा तसेच कोरोना काळात वयाधिक झालेल्या कर्मचाऱ्यांना विहित वय .../२

# शिक्षिका महिलेवर बलात्कार करणाऱ्या दोघा आरोपींना गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने बारा तासात केले जेरबंद



**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका शिक्षिका महिलेवर बलात्कार करणाऱ्या दोघा आरोपींना गुन्हे शाखा कक्ष २ पनवेने अवघ्या बारा तासात जेरबंद केले आहे.

तळोजा पोलीस ठाणे हदिद्त सुरत येथील महिला शिक्षिका वय २१ वर्षे हिची इंस्टाग्रामवरून मैत्री झालेल्या मित्रास त्याच्या वाढदिवसा निमित्ताने मुंबई येथे भेटण्यास आली असताना त्या मित्राने तिला तळोजा येथे त्याचे राहणा-या मित्राचे रूमवरती तिला घेवून जावून तेथे तिला बिअर पाजून तिच्या सोबत जबरदस्तीने शारीरीक संबंध प्रस्थापित केले. तसेच त्याचे सोबतच्या मित्राने देखिल तिच्या शरीराशी असभ्य चाळे करून तिचे मनास लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले. सदर महिलेस संधी मिळताच तिने सदर रूममधुन पळ काढुन १०० नंबर वर कॉल करून पोलीस मदतीची मागणी केली. परंतु त्यादरम्यान सदरच्या दोन्ही आरोपींनी तेथून पळ काढला होता. सदर पिडीत शिक्षिका महिलेने झालेल्या प्रकाराबाबत तळोजा पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करताच अति संवेदनशिल व गुन्हयाचे गांभीय लक्षात घेवून पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह, अपर पोलीस आयुक्त महेश घुर्ये, पोलीस उप आयुक्ते, सुरेश मेंगडे यांनी सदर गुन्हयातील आरोपींचा तात्काळ शोध घेवून गुन्हा उघडकीस आणण्याबाबत आदेशीत .../२

# बंद घराच्या दरवाज्याचा कोयंडा कापून घरफोडी दाखल

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव मधिल मौजे निजामपूर रोड येथिल गणेश नगर मधिल चिंतामण निवास या घराचा दिनांक १७ फेब्रुवारी संध्याकाळी साडेपाच वाजता पासुन ते २२ फेब्रुवारी दुपारी दिड वाजताचे सुमारा दरम्यान, समजुन न आलेले अज्ञात वहान वापरुन कोणीतरी अज्ञात चोरट्याने नरेश नारायण नागे यांच्या या बंद असलेल्या घराचे दरवाज्याच्या कोयंडा कोणत्यातरी धारदार हत्याराने कापुन त्यातील कुलुप काढुन त्या वाटे घरात प्रवेश करुन घरफोडी करुन चोरी केली आहे.

यामध्ये घरातील जुनी वापरात असलेली सुमारे २०.०३० ग्रॅम वजनाची चेन किंमत्त अंदाजे ५९,७७०/- रुपये व सुमारे ०२.२४०/- ग्रॅम वजनाचे ७,१००/- रुपये किंमतीचे लॉकेट, एकुण ६६,८७०/- रुपयांच्या माल लंपास करुन चोरटा फरार झाल्याची फिर्याद माणगांव पोलीस ठाण्यात दिनांक २२फेब्रुवारी रोजी रात्री ९.४० वाजता नरेश नारायण नागे .../२



# संघर्षाच्या ज्वाळा...

अस्तंगत सोविएत युनियनचे अखेरचे अध्यक्ष मिखाईल गोर्बाचोव यांनी संपविलेले शीतयुद्ध त्यांच्याच हयातीत पुन्हा सुरू झाले; इतकेच नाही तर, व्लादिमीर पुतिन यांच्यासारखा रशियाचा आक्रमक अध्यक्ष गेल्या तीन दशकांचा इतिहास पुसून टाकण्यासाठी अमेरिकेला सरळच आव्हान देऊ लागला आहे. रशियाला लागून असलेल्या युक्रेन या स्वतंत्र राष्ट्रामधील दोनेत्स्क आणि लुहान्स्क या दोन प्रांतांना 'स्वायत्त प्रांत' म्हणून रशियाने मान्यता देऊन टाकली आहे. इतकेच नाही तर, या प्रांतातील केंद्रीय सत्तेच्या विरोधात भांडणाऱ्या बंडखोरांच्या मदतीला आपले सैन्य उतरविले आहे. या दोन्ही प्रांतांमध्ये शांतता नांदावी, यासाठी आपण हे पाऊल उचलत असल्याचे पुतिन यांनी म्हटले असले तरी 'मूर्खपणा' या शब्दात अमेरिकेने या समर्थनाची वासलात लावली आहे. अमेरिकेच्या इशाऱ्याची वाटच पाहात असल्यासारखे 'नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन' म्हणजे 'नाटो'चे स्वामीनिष्ठ सदस्य लगेच वागू लागतात. ब्रिटनने रशियावर आर्थिक निर्बंध घालण्यास आरंभ केला आहे आणि जर्मनीनेही काही संयुक्त प्रकल्पांना स्थगिती दिली आहे. आत्ता आत्ता अमेरिका आणि नाटो सदस्य अफगाणिस्तानातून बाहेर पडले आहेत. आता पुन्हा युक्रेनमध्ये प्रत्यक्ष सैन्य उतरविण्याची हिंमत ते दाखवतात का, यावर जगाची वाटचाल गंभीर संघर्षाच्या दिशेने होणार की नाही, हे दिसेल. दुसऱ्या महायुद्धानंतर जन्माला आलेली नाटो संघटना शीतयुद्ध संपल्यानंतर विस्तारण्याचा चंगच अमेरिकेने बांधला आणि आता युक्रेनला त्यात घेण्याच्या हालचाली सुरू झाल्या. रशियाला हे मान्य होणे, अशक्य होते. एकेकाळी आपलाच भाग असणारा हा प्रांत शत्रुगटात गेलेला रशियाला आणि त्यातही पुतिन यांनी कसे खपवून घेतले असते? आता युक्रेनचे अध्यक्ष व्लादिमिर झेलेन्स्की 'आम्ही वाटेल त्या परिस्थितीचा सामना करण्यास सिद्ध आहोत' असे म्हणत असले तरी त्यांच्या बोलण्यातला सारा दम अमेरिका प्रत्यक्ष मैदानात उतरते का, यावर अवलंबून आहे. तसे होण्याची शक्यता कमी वाटते. गेल्या काही काळात चीनशी अभूतपूर्व दोस्ती केलेल्या रशियाला 'नाटो'च्या आर्थिक निर्बंधांची अपेक्षा असणारच. चीनच्या मदतीने या निर्बंधांना तोंड देण्याची रशियाची तयारी दिसते. आज रशिया हा सौदी अरेबियाच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकाचा तेल उत्पादक आहे. हे जास्तीत जास्त तेल तर अमेरिकाच खरेदी करते. नैसर्गिक वायू उत्पादनात तर रशिया जगात पहिल्या क्रमांकावर आहे. त्यामुळे, रशिया-युक्रेन सीमा तापताक्षणी जगातील तेल उकळू लागले आहे. करोनाच्या तडाख्यातून जग सावरत असताना जगाच्या अर्थकारणाला हा मोठा तडाखा बसणार आहे. या सगळ्या परिस्थितीला पुतिन यांचा विस्तारवाद जसा कारणीभूत आहे; तसाच अमेरिकेचा आपण आता जगात एकमेव महासत्ता असल्याचा अतिरेकी अहंकारही कारण आहे. शीतयुद्ध संपल्यानंतर रशियाशी नव्याने आणि नवे संबंध जोडण्याचा प्रामाणिक प्रयत्न अमेरिका तसेच इतर नाटो सदस्यांनीही केला नाही. सोविएत युनियनचे तुकडे पडले म्हणजे रशिया आता कायमचा दुबळा झाला, अशा भ्रमात अमेरिका व युरोप राहिले. त्याची फळे आज भोगावी लागत आहेत. अमेरिका व नाटो विरुद्ध रशिया, चीन आणि चीनचे अंकित देश या संघर्षाला आता अधिक टोक येत जाईल. या साऱ्या प्रतिकूल पर्यावरणात एकीकडे भारताची जशी कोंडी होणार आहे; तशीच भारताला आपली जुनी 'अलिप्त राष्ट्र चळवळी'चे नेतृत्व करताना निभावलेली भूमिका पुन्हा घ्यावी लागेल, असे दिसते. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या अलीकडच्या विधानांवरून भारताच्या या भूमिकेचे संकेत मिळतात. 'क्वाड' हा राष्ट्रसमूह चीनच्या विस्तारवादाच्या विरोधात बांधला गेला असला तरी या ताज्या संघर्षात या गटाला काही भूमिका नाही, हे जयशंकर यांचे म्हणणे योग्यच आहे. युक्रेनचा प्रश्न शांततेने सोडविण्याची भारताची विनंतीही अमेरिकेपासून काहीसे अंतर राखणारी आणि रशिया या जुन्या मित्राला दिलासा देणारी आहे. जेथे संघर्ष होईल, तिथे आपले सैन्य पाठवायचे, हा अतिरेक दुसऱ्या महायुद्धानंतर जसा अमेरिकेने केला तसाच तो रशियानेही केला. यात अनेक देश बेचिराख होण्याची वेळ आली. युक्रेनमधील संघर्षाच्या निमित्ताने तसे काही होऊ नये, यासाठी भारत काही समविचारी देशांना आवाहन करून पुढाकार घेतो का, हे लवकरच समजेल. या साऱ्यात चीनचा लाभ होणार आहे. करोनापर्वापासून पाश्चात्य देश व अमेरिका सातत्याने चीनला अनेक निमित्तांनी लक्ष्य करीत होते. हा सारा फोकस आता रशियाकडे वळला आहे. त्यातच रशिया व चीन मैत्रीत; चीनचेच पारडे जड राहणार आहे. या साऱ्या धुमश्चक्रीत भारत सक्रिय होऊन संभाव्य जागतिक संघर्ष कमी करण्यासाठी काही सकारात्मक पावले टाकतो का, हे आता पाहायला हवे. खरेतर, तशी ती टाकायलाच हवीत.

# इच्छापुर्ती होम्स मौजे हरिग्राम पनवेल येथील चारही इमारतींना अभय

## उच्च न्यायालयाचा नियमित करण्याचा आदेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मौजे हरिग्राम, ता.पनवेल, जि.रायगड येथे स.नं.६/२/ब मध्ये साधारणपणे ३६.७ गुंठे या क्षेत्रावर, इच्छापूर्ती डेव्हलपर्सच्या चार मजली इमारतींचे सुसज्ज गृहसंकुल २०१७ पासून दिमाखात उभे आहे. सदरच्या गृहसंकुलात साधारणपणे १०४ सदनिका असून साडेचारशे ते पाचशे लोकांचे वास्तव्य आहे.

२०१४ साली त्या बांधकाम व्यावसायिकाने स.नं.६/२/ब ही जमीन हरिग्राम ग्रामपंचायत हद्दीतील रजिस्टर खरेदीखताने विकत घेतली. त्यानंतर तहसीलदार व जिल्हाधिकारी यांच्यामार्फत उत्खनन परवाना, बिनशेती परवाना, रहिवाशी बांधकामासाठी सनद इत्यादी प्राप्त करून ग्रामपंचायत अधिनियम १९५२ अन्वये बांधकाम परवाना घेवून रितसर बांधकाम पूर्ण केले आहे. सदर जागेवर चार मजलीच्या चार इमारतींचे बांधकाम आहे.

दरम्यानच्या कालावधीत जिल्हाधिकारी, ग्रामपंचायत, नगरपालिका अशा वेगवेगळ्या अस्थापनांकडे मौजे हरिग्राम यांचा नियोजन प्राधिकारी होते. शेवटी सिडको मार्फत नैना यांना मौजे हरिग्राम यांचे नियोजनाधिकारी नेमले गेले होते.

सिडको प्रशासनाने सदरच्या इमारतीस नोटीस बजावली. सदर नोटीसीला इच्छापूर्ती डेव्हलपर्सनी उच्च न्यायालयात ॲड. संकेत दिपक ठाकूर व ॲड.राहूल ठाकूर यांच्यामार्फत आव्हान दिले व सदर नोटीसीला आव्हानित करून सदर बांधकाम नियमित करण्यासंबंधात पावले उचलली. सदर उच्चन्यायालयात न्यायमुर्ती अमजद सय्यद व न्यायमुर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्यासमोर सुनावणी होवून उच्च न्यायालयाने सिडकोमार्फत महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट अंतर्गत देण्यात आलेल्या नोटीसीला स्थगिती आदेश देत इच्छापूर्ती डेव्हलपर्सच्या चारही इमारती नियमित करण्याबाबत सिडको प्रशासनाला तसा आदेश देवून याचिका निकालास काढली. सदर निकालामुळे इच्छापूर्ती डेव्हलपर्सच्या चारही इमारती नियमित करण्याचा मार्ग मोकळा झाला असून चारही इमारतीत राहणाऱ्या लोकांनी विकासकाचे अभिनंदन केले आहे.

# कु.ज्ञानदा उस्तुरे वक्तृत्व स्पर्धेत तळा तालुक्यात पहिली

**दै.रायगड नगरी । तळा**

शाळा फाऊंडेशन बार्शी, आयोजित शिवजयंती महोत्सव २०२२ निमीत्ताने २ री राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत तळा येथील इयत्ता पहिली मधील विद्यार्थीनी कु.ज्ञानदा गहिनीनाथ उस्तुरे हिने सहभाग घेतला होता. स्पर्धेचा विषय होता-रयतेचा राजा सदर स्पर्धेमध्ये इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंतच्या गट क्रमांक-१मध्य महाराष्ट्रातील असंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत ज्ञानदा गहिनीनाथ उस्तुरे रायगड जिल्हा परिषद शाळा तळे मराठी ता.तळा जि.रायगड या विद्यार्थीनीने राज्यातुन तृतीय क्रमांक पटकावुन तळा तालुका व रायगड जिल्हांची मान उंचावली आहे.

मागील दोन वर्षे कोरोना काळापासून शाळा बंद असल्याने ऑनलाईन शिक्षण सुरु असल्याने वत्कृत्व स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याच्या दृष्टीने शाळा फाऊंडेशनचे संस्थापक प्रताप-सिंह मोहीते यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेत अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असताना कु.ज्ञानदाने अभ्यास पुर्वक विषय हाताळणी, खणखणीत आवाज, चेहऱ्यावरील हावभाव, आणि तीने देखील घेतलेली मेहनतीने यश प्राप्त केले आहे. विधान परिषदेचे आमदार मा.अनिकेत तटकरे यांनी शिवजयंती दिनी गो.म.वेदक विद्यामंदिर तळा येथे उपस्थित कार्यक्रमात नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर यांच्या यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन सत्कार करून विशेष कौतुकाची थाप दिली. मिळवलेल्या या यशा बद्दल तिचे सर्व स्तरातुन कौतुक होत पुढील काळासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# वाघेज पावभाजी सेंटरमध्ये घरफोडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील वाघेज पावभाजी सेंटरमध्ये अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून रोख रक्कमेसह इतर ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

शहरातील वाघेज पावभाजी सेंटर हे बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करून आतमध्ये असलेली रोख रक्कम व इतर ऐवज चोरुन नेला आहे.

यावेळी त्यांच्या हालचाली सीसीटीव्ही फुटेजमध्ये चित्रीत झाल्या आहेत.

# नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्याकरीता फिरती ओ.पी.डी केंद्र सुरु करा : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोविड कालावधीत काम केलेल्या आरोग्य सेवकांना पद मुक्त न करता नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्याकरीता फिरती ओ.पी.डी केंद्र सुरु करण्याची मागणी विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी आयुक्तांकड़े निवेदनाद्वारे केली आहे.

काही दिवसापासून कोविडमध्ये काम करणाऱ्या ए.एन.एम., जि.एन.एम., फार्मासिस्ट, आर.एम.ओ., लॅब टेक्निशियन अशा अनुभवी आरोग्य सेवकांना पदमुक्त करण्यात आले आहे. पालिकेच्या आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी अनुभवी आरोग्य सेवकांची आवश्यकता आहे. काही दिवसा-पूर्वी पालिकेच्या आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी ११ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झाले आहेत. सद-रचे आरोग्य केंद्र अस्तित्वात येण्यासाठी काही कालावधी जाईल. पनवेल महानगरपालिका अस्तित्वात येताना २९ ग्रामपंचायतीचा समावेश करण्यात आ-लेला आहे. प्रत्येक घरापर्यंत आरोग्य सेवा पुरविण्याकरीता महानगरपालिकेने फिरता बाह्य रुग्ण विभागाची निर्मिती करण्यात यावी. या करिता अनुभवी आरोग्य सेवकांची आवश्यकता लागणार आहे. तरी सद्या कोविड कालावधीमध्ये काम केलेल्या ज्या आरोग्य सेवकांना पदमुक्त केले गेले आहे. अशा आरोग्य सेवकांना वर्ग करून फिरती ओ.पी.डी हि संकल्पना सुरु करण्याकरिता सामावून घेण्यात यावे.

जेणेकरून अनुभवी आरोग्य सेवकांचा नागरिकांना विविध आरोग्य सेवा देण्यासाठी उपयोग होईल, तरी तातडीने उपरोक्त विषयावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे निवेदन विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेवक गणेश चंद्रकांत कडू, नगरसेविका डॉ.सुरेखा विलास मोहोकर, सारिका अतुल भगत, प्रिती जॉर्ज म्हात्रे यांनी पनवेल आयुक्तांकड़े केली आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## परदेशातून आलेल्या मालाचा अपहार करणाऱ्या टोळीस पोलिसांकडून अटक

सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या २४ तासामध्ये पनवेल शहर पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण विभागाचे सहा.पोलीस निरीक्षक गणेश दळवी यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकासह तांत्रिक तसेच गोपनिय माहितीच्या आधारे गुन्हयातील अपहार झालेला मुद्देमाल रुपये १,१३,३७,४१९/- चे आरएस-६०२ या नावाच्या केमिकलचे ४४ बॅरल आणि एचएमएस-२४० बी या नावाच्या केमिकलचे ८० बॅरल हे भिवंडी येथील वेअर हाऊस मधुन हस्तगत करणयात आले.

त्यानंतर गुन्हयातील आरोपी भरत उंडे याचा या गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह,पोलीस सह. आयुक्त जय जाधव, पोलीस उपआयुक्त शिवराज पाटील, परिमंडळ २, पनवेल, भागवत सोनवणे, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने व पोलीस निरीक्षक (गुन्हे) संजय जोशी, सपोनि. गणेश दळवी, पोहवा नितीन वाघमारे, पोहवा अविनाश गंथडे, पोना महेश पाटील, पोना परेश म्हात्रे, पोना अशोक राठोड, पोना भगवान साळुंके व पोशि संतोष मिसाळ या पथकाने केलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास पनवेल शहर पोलीस ठाणेमार्फत चालु आहे.

## सफाई कामगारांच्या वारसा हक्काचा प्रश्न मार्गी लागणार : ना.धनंजय मुंडे

करण्यात येईल. सर्व बाबींचा सर्वांगीण विचार करून लाड पागे समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत आतापर्यंत विविध विभागांनी सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबत काढलेले सर्व शासननिर्णय एकत्र करून सुधारीत शासननिर्णयाचा प्रस्ताव मंत्रीमंडळात सादर करण्यात येईल यामुळे राज्यातील सर्व महानगर पालिका व नगरपालिकामधील वारसा हक्काचा प्रश्न सुटण्यास मदत होईल असे श्री. मुंडे यांनी सांगितले.

धारावी येथे संत रोहिदास सभागृह, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह तसेच धारावी येथे भीम थीम पार्क उभारणे हे तीन प्रस्ताव सामाजिक न्याय विभागाकडे सादर करण्यात यावेत, लवकरात लवकर या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येईल, असे सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी यावेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झालेल्या शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांना सांगितले.

मागील काही वर्षांपासून राज्य स्तरावर दिव्यांग अधिकारी-कर्मचारी, उद्योजक, दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या संस्था यांना त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीसाठी राज्य शासनाच्या वतीने दिले जाणारे पुरस्कार या वर्षी दिले जावेत यासाठी राज्य शासन सकारात्मक आहे. मागील पाच वर्षातील प्रलंबित पुरस्कार प्रदान करण्यासाठी टप्प्याटप्प्याने निधी उपलब्ध करून देण्यात येईल अशी माहिती सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

## राज्य सरकारी कर्मचारी दोन दिवसाच्या संपावर

मर्यादेत सूट द्या.१. नर्सेस/ आरोग्य कर्मचाऱ्यांच्या समस्यांचे तत्काळ निराकरण करा.१०. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मंजूर करा. ११.शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सेवांतर्गत प्रश्न (सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना१०:२०:३० वर्षे व इतर) तत्काळ सोडवा.१२. निवृत्तीचे वय ६० वर्षे करा. १३ नवीन शिक्षण धोरण रद्द करा.१४. किंमती कमी करण्यासाठी पेट्रोलियम पदार्थावरील केंद्रीय कर या सह आदी मागण्यांसाठी हा संप पुकारला आहे.

## आरोपींना गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने बारा तासात केले जेरबंद

केल्याने नमुद गुन्हयाचा तपास सहाय्यक पोलीस आयुक्त विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे व त्यांच्या पथकाने गोपनिय माहिती व तांत्रिक बाबींचा तपास करून गुन्हयातील पाहिजे आरोपी आयुब इद्रिस खान (२१), व शहाबाज जाहिर आली(२०) हे त्यांचे मुळगावी रिवा, मध्य प्रदेश येथे रेल्वेने पळुन जाणार असल्याबाबत मिळालेल्या गोपनिय माहिती व तांत्रिक तपासात निष्पन्न झाल्याने गुन्हे शाखा कक्ष २ नेमणूकीतील पोलीसांचे पथक तयार करून त्यांना तात्काळ लोकमान्य टिळक टर्मिनल येथे पाठविण्यात आले.

सदरचे आरोपी हे फलाटावरुन मध्य प्रदेश साठी सुटलेल्या रेल्वेने त्यांचे मुळगावी पळुन जात असताना गुन्हे शाखा कक्ष नेमणूकीतील पोहवा वाघ, पोहवा बैकर व पोना डोंगरे यांनी क्षणाचाही विलंब न लावता स्वतःचा जिव धोक्यात घालुन चालु रेल्वे मध्ये चढुन आरोपींचा पाठलाग करून शोध घेवून नमुद गुन्हयातील आरोपींना ताब्यात घेतल्यानंतर ते पुढिल स्टेशनवर उतरले. नमुदच्या आरोपींनी सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिल्याने त्यांना पुढिल कारवाईसाठी तळोजा पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहेत.

## बंद घराच्या दरवाज्याचा कोयंडा कापून घरफोडी दाखल

यांनी दिली आहे. यावरुन कॉ. गु. रजि. नंबर ४०/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे माणगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माणगांवचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र पाटील यांनी घटना स्थळी भेट दिली असुन पोलीस नाईक/१६२४ खिरीट हे अधिक तपास करीत आहेत.

# स्व. विनय धनावडे यांच्या स्मरणार्थ चौक उभारावा : राकेश कोकळे

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानचे सुपुत्र निवृत्त भारतीय सैनिक (सुभेदार ) स्व.विनय रमेश धनावडे यांचे नुकताच आजारपणाने निधन झाले.माथेरान मधील एकमेव भारतीय सैनिक असल्याने त्यांनी देशासाठी दिलेल्या अभूतपूर्व योगदाना बद्दल त्यांची स्मृती अखंड राहावी येणाऱ्या पिढीला सुद्धा देश सेवेबद्दल माहिती असावी यासाठी विनय धनावडे यांचे नाव एखाद्या रस्त्याला द्यावे अथवा एखादा चौक त्यांच्या नावाने उभारण्यात यावा जेणेकरून माथेरान मधील युवा पिढीला विनय धनावडे यांनी देशासाठी केलेल्या योगदानाबद्दल माहिती अन प्रे-रणा मिळेल यासाठी येथील धनगर समाज अध्यक्ष तथा अश्वपाल संघटनेचे क्रियाशील सदस्य राकेश विलास कोकळे यांनी माथेरान नगरपरिषदेच्या कार्यालयात मुख्याधिकारी तथा कार्यतत्पर प्रशासक सुरेखा भणगे-शिंदे यांना निवेदन सादर केले आहे.सदरचे निवेदन मुख्याधिकारी अनुपस्थित असल्याने लिपिक अजय साळुंखे यांनी स्वीकारले यावेळी ,अकाऊंटंट अंकुश इचके ,शिपाई उमेश मोरे, ज्ञानेश्वर सदगीर, वर्तक तसेच राकेश कोकळे यांच्या समवेत अश्वपालक करन जानकर, किशोर कासुरडे, यांसह अन्य नागरिक उपस्थित होते.

# दुबई येथे नोकरीला लावतो असे सांगून केली फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुबई येथे नोकरी ला लाव-तो असे सांगून सतरा जणांची सात लाख ६० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी साजिद खान व इस्लामुद्दीन अंसारी यांच्याविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबई येथील सय्यद सफाद उल्ला सय्यद नियामत उल्ला यांना काम धंदा नसल्याने जॉबची आवश्यकता होती. सय्यद हे कामोठे येथे जाऊन साजिद खान व इस्लाम उद्दीन अंसारी यांच्याकडे गेले. त्यांनी दुबई येथे एक्सपो मध्ये जॉब लावून देतो व त्याकरता चाळीस हजार रुपये खर्च येईल असे सांगितले. यावेळी त्यांनी दहा हजार रुपये दिले. त्यानंतर अन्सारी याने दुबईचा विजा व्हाट्सअप वर पाठवला व तीस हजार रुपये राहिलेले पैशांची मागणी केली. त्यावेळी वीस हजार रुपये सय्यद यांनी पाठवले. त्यानंतर दुबई येथे जाण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी सय्यद यांच्यासोबत कोणत्याही प्रकारचा संपर्क केला नाही. यावेळी परिसरातील इतर लोकांनी दुबई येथे जाण्याकरता अन्सारी व खान यांना पैसे देऊन देखील त्यांना दुबईला पाठवले नसल्याचे समजले. तसेच काही लोकांना दुबईला पाठवले मात्र त्यांना कोणत्याही प्रकारचे जॉब दिले नसल्याचे त्यांना समजले. साजिद खान व इस्लामुद्दीन अन्सारी यांनी आपसात संगणमत करून सय्यद सफाद उल्ला सय्यद नियामत उल्ला, बाबर हुसेन शेख, मोहमद सिराज मोहमद मोहसिन, इम्रान युनूस कुरेशी, हर्षद अल्ली शेख, इरफान मोहमद निजाम शेख , सोहेल अहमद अशफाक शेख, मोहम्हद सला शेख, शोहेब अबदुल सत्तार शेख, मोहम्म्द इरफान, अकबर अल्ली मनसुर, मयंकगिरी बिष्ट, रईस अहमद कुरेशी, अब्दुल गफार साहेब , करिम तारामिया शेख, अमन जावेद खान, किशोर मेघनाथ राठोड यांच्याकडून ७ लाख ६० हजार रूपये घेवुन दुबई येथे नोकरी न देता फसवणुक केली.


**महाराष्ट्र शासन-कृषी विभाग**

**ई निविदा सूचना क्र.०२/२०२१-२२ जा.क्र./उविकृअ/निविदा-०२/२४०/२०२२ दिनांक-२२/०२/२०२२**

रायगड जिल्ह्यातील खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे आदर्श गाव योजनेंतर्गत मृत व जल संधारणाची कामे करण्यासाठी उपविगीय कृषी अधिकारी माणगाव, जि.रायगड यांचेकडून सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन योग्य त्या वर्गातील रायगड जिल्ह्यातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून खालील नमूद केलेल्या कामांकरिता ऑनलाईन ब-१ निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२५/०२/२०२२ पासून पहावयास व डाऊनलोड करावयास मिळेल. सर्व शुद्धीपत्रक, दुरुस्त्या व सुचना याच संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (रु.) | कामाचा कालावधी | ठेकेदाराचा वर्ग | अनामत रक्कम १ टक्के (रु.) | सुरक्षा ठेव २ टक्के (रु.) | निविदा संच शुल्क | कोरे निविदा प्राप्त करण्याचा दिनांक व वेळ | निविदा भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिमेंट नाला बांध गट क्र.१, मौजे आदर्श गाव गोवेले, ता.माणगाव, जि.रायगड | १०५७९८५ | ६० दिवस | पात्र नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था | १०५७८ | २११६० | रु.५९० | २५/०२/२०२२ ११:०० | ११/०३/२०२२ १६:०० | १४/०३/२०२२ १६:०० |

सुचना :-

१) कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषी अधिकारी, माणगाव यांना राखून ठेवला आहे, याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२) बयाणा रक्कम व निविदा फी या सर्व रकमा ऑनलाईन अदा करावयाच्या आहेत. सर्वसाधारणपणे RTGS/NEFT प्रणालीद्वारे रक्कम जमा होण्यास विलंब लागतो. निविदाकारांनी सावधानता बाळगून निविदा सादर करण्याच्या किमान एक दिवस आधी सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी.

३) परफॉर्मन्स सिक्युरिटी- वाचा शासननिर्णय क्र./सीएसटी/२०१७/प्र.क्र.२/इमा.२/मंत्रालय मुंबई दि.२७/०९/२०१८ व शासन परिपत्रक दि.२२/१०/२०१८ सदर शासन निर्णयाप्रमाणे परिच्छेद क्र.४.६ व ५.१.१ नुसार कंत्राटदाराने १० टक्केपेक्षा अधिक दराने निविदा कमी भरली असेल तर कंत्राटदाराने एवढ्या कमी दरोत काम करण्याच्या नियोजनाबाबत सविस्तर तपशिल द्यावा लागेल, त्याची खात्री झाल्यासच निविदा मंजूर करण्यात येईल. प्राप्त निम्न निविदेचा देकार निविदाधिन निविदेकाराने किंमतीपेक्षा ० टक्क्यापर्यंत दराचा असेल तर ठेकेदाराने निविदाधिन किंमतीच्या १ टक्का एवढा डी.डी.परफॉर्मन्स सिक्युरिटी सादर करावा लागेल. तसेच देकार १० टक्क्यापेक्षा जेवढ्या जास्त दराने आहे तेवढ्या रकमेचा व वरील प्रमाणे बँकेची प्रतिपूर्ती हमी/डीडी L1 कंत्राटदारास देय असेल.

४) वाचा शासन निर्णय परिपत्रक क्र.सीएसटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा.२ दि.२६ नोव्हेंबर नुसार L1 निविदाकाराने Additional Performance Secuirty चा डिडी रक्कम आठ दिवसाच्या आत संबंधित कार्यालयात जमा करण्यात यावा. ही अट कोणत्याही परिस्थितीत शिथील करण्यात येणार नाही.

५) वाचा शासननिर्णय दि.२१/०१/२०१७ सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र.ः न्याय प्र-१५१६/प्र.क्र.२४५/९-स मंत्रालय मंबई-३२ नुसार मजूर सहकारी संस्थांना काम मिळविण्याकरिता पात्रता प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

६) कंत्राटदार मशिनरी शक्यतो स्वतःच्या मालकीची असावी. भाड्याने घेणार असल्यास रुपये १००/- च्या स्टॅम्पवर करारनामा व ज्याच्या नावे मशिनरी आहे त्याचे आर.सी. बुक जोडण्यात यावे. कामे भरताना कामाचे प्रकारानुसार आवश्यक ती मशिनरी व तंत्रज्ञ असणे अनिवार्य आहे.

७) इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील.

जा.क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/२४२

**सही/-**
**(कैलास वानखेडे)**
**उपविभागीय कृषी अधिकारी**
**माणगाव, जि.रायगड**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## ३५ हजार ४५० रुपयांची वीज चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विद्युत उपकरणासाठी अनधिकृतपणे वीजपुरवठा घेऊन ३५ हजार ४५० रुपयांची वीज चोरी केल्याप्रकरणी अब्दुल कादिर आली पोइंजेकर यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तळोजा ग्रामीण शाखा अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये वीज चोरी होत असल्याची माहिती महावितरणला मिळाली. त्यानुसार तपासणी मोहिमेअंतर्गत तळोजा गाव येथे अब्दुल कादिर आली पोइंजेकर यांच्या घरामध्ये महावितरण कंपनीच्या खांबावरून अनधिकृतपणे वायर जोडून विजचोरी सापडून आली २ हजार ९६२ युनिटचे व ३५ हजार ४५० रुपयांचे महावितरणचे नुकसान केले.

## खांदा कॉलनी येथे संत गाडगेबाबा जयंती उत्सव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

संत गाडगेबाबा चौक, खांदेश्वर रेल्वे स्टेशन, कामोठे येथे कर्मयोगी संत गाडगेबाबा विचार मंच प्रतिष्ठान व योगा ग्रुप खांदेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने संत गाडगेबाबा जयंती उत्सव २७ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता साजरा केला जाणार आहे.

यावेळी दिलीप बाबा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून डॉक्टर संदीप घोडके हे गाडगे बाबांच्या जीवनावर व्याख्यान देणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## लीलावती फके यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तक्का, पनवेल येथील लीलावती यशवंत फके यांचे राहत्या घरी निधन झाले आहे. त्या ८१ वर्षांच्या होत्या. त्यांच्यावर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पाच मुले, सुना व नातू, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी एक मार्च रोजी आणि उत्तरकार्य ४ मार्च रोजी होणार आहे.

## संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनाचे अभिवादन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आधुनिक काळातील महान संत, स्वच्छ भारताचे प्रणेते संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून तहसिलदार विशाल दौंडकर यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन केले.

यावेळी नायब तहसिलदार संतोष पाटील तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या तातडीच्या निर्णयामुळे बालविवाह रोखण्यात जिल्हा प्रशासन यशस्वी

## बालविवाहासारख्या अनिष्ट प्रथांना बळी न पडण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या तातडीच्या निर्णयामुळे मुरुड तालुक्यातील मौजे भोईघर येथील टेंभोंडे आदिवासीवाडी येथे होणारा बालविवाह रोखण्यात जिल्हा प्रशासनाला यश मिळाले. या घटनेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी जनतेला आवाहन केले आहे की, बालविवाहासारख्या अनिष्ट प्रथांना बळी पडू नका. जिल्ह्यातील कातकरी आदिवासी बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांना सर्व प्रकारचे शासकीय लाभ, दाखले मिळवून देण्यासाठी, आरोग्य सोयी सुविधा मिळवून देण्यासाठी, त्यांचे स्थलांतर रोखण्यासाठी, त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या पुढाकारातून कातकरी उत्थान अभियान व सप्तसूत्री कार्यक्रम सर्व स्तरांवरून राबविण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांना दि.२१ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ०८.०० वाजताच मौजे भोईघर येथील टेंभोंडे आदिवासीवाडी येथे बालविवाह होत असल्याची माहिती मिळाली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी तातडीने मौजे भोईघर येथील टेंभोंडे आदिवासीवाडी येथे जाण्याबाबत व संबंधितांचे प्रबोधन करून हा बालविवाह रोखण्याच्या दृष्टीने यंत्रणेला आवश्यक ते निर्देश दिले.

त्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी अलिबाग श्री.प्रशांत ढगे व मुरुड तहसिलदार श्री.रोहन शिंदे यांनी तात्काळ मुरुड तालुक्यातील निवासी नायब तहसिलदार श्री.रविंद्र सानप, भोईघर तलाठी अमृत चोगले यांना घटनास्थळी तात्काळ पाठविले. भोईघर गावचे सरपंच श्री.काशिनाथ वाघमारे व ग्रामपंचायत कर्मचारी यांनी चौकशी केली असता टेंभोंडे आदिवासीवाडी येथे दुपारी २.००च्या सुमारास कु.राणी वाघमारे, वय १५ रा. टेंभोंडे व कु.शांताराम लक्ष्मण जाधव, वय १७, रा.साळाव आदिवासीवाडी संजयनगर यांचा बालविवाह होणार असल्याची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा केल्यानंतर स्थानिक प्रशासनातील निवासी नायब तहसिलदार श्री.रविंद्र सानप, भोईघर तलाठी अमृत चोगले, भोईघर गावचे सरपंच श्री.काशिनाथ वाघमारे या सर्वांनी मुलीची आई श्रीमती यमुना लक्ष्मण वाघमारे व त्यांच्या कुटुंबियांचे हा बालविवाह न करण्याबाबत योग्य प्रबोधन व मार्गदर्शन केले.

त्याचप्रमाणे वर मुलगा मौजे साळाव येथील असल्याने रेवदंडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री.अशोक थोरात, मंडळ अधिकारी श्री.लक्ष्मण शेळके, साळाव तलाठी श्रीमती भावना धोदडे, निडी पोलीस पाटील श्री.नितेश पाटील, साळाव पोलीस पाटील श्री.मेहबूब हुसैन गोरमे व साळाव ग्रामपंचायत सदस्य राजू वाघमारे, साळाव सरपंच निलम पाटील, ग्रामस्थ श्री.नरेश वाघमारे या सर्वांनी मौजे साळाव येथेच मुलाचे वडील श्री.लक्ष्मण जाधव व त्यांच्या कुटुंबियांचे प्रबोधन व मार्गदर्शन करुन बालविवाह रोखला. यावेळी या दोन्ही कुटुंबांकडून हा बालविवाह करणार नसल्याची लेखी हमीही घेण्यात आली.

अशा प्रकारे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने केलेल्या तात्काळ कार्यवाहीने हा बालविवाह यशस्वीपणे रोखण्यात आला. तसेच संबंधित दोन्ही कुटुंबांचे प्रबोधन करून बालविवाहसारख्या अनिष्ट प्रथेबद्दल जनतेमध्ये जागरूकता वाढविण्यासाठी पाऊल उचलले गेले.

## माणगांव खांदाड येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी ग्रंथाचे सामुदायिक पारायण

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

दरवर्षी प्रमाणे हे ४१ वे वर्ष असून या वेळेस दिनांक २४ फेब्रुवारी ते २ मार्च पर्यंत अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी ग्रंथाचे सामुदायिक पारायणाचे आयोजन माणगांव सोनभैरव मंदिर खांदाड येथे ग्रामस्थ मंडळ खांदाड व समस्त सद्गुरु सेवा परिवार यांनी केले आहे. परमपूज्य श्री. सद्गुरू शंकर दगडे महाराज,आंदोरी जि.सातारा व परमपूज्य सद्गुरू श्री. पांडुरंग सुतार महाराज, व गुरुमाता सूनिती पांडुरंग सुतार महाड यांच्या कृपाआशीर्वादाने श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे सामुदायिक पारायण आयोजित केले आहे. पारायणाचा शुभारंभ व कलश पूजन, विणा पुजन गुरुवर्य श्री.आजीव पांडुरंग सुतार यांच्या शुभहस्ते गुरुवार दिनांक २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वा. होईल.

तसेच दैनंदिन कार्यक्रम सकाळी ५ वा. काकड आरती,तसेच सकाळी ८ ते १२ व दुपारी ३ ते ५ वा. श्री. ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पारायण, दुपारी १२ ते १ व सायंकाळी ६ ते ७ प्रवचन, सायंकाळी ७ ते ८ हरिपाठ, व रात्री ९ ते ११ किर्तन व रात्री १२ ते ५ हरीजागार तसेच दिनांक १ मार्च रोजी ४ वाजता श्री ज्ञानेश्वरी पारायणाची सांगता श्री सद्गुरू सेवा मंडळ माणगांव यांच्या शुभहस्ते. व दि. २ मार्च रोजी सकाळी ८ वा. दिंडी सोहळा व १० वा. ह.भ. प श्री. टोगळे महाराज, खांब यांचे कीर्तन असे आयोजन करण्यात आले असून ग्रामस्थ मंडळ खांदाड व समस्त सद्गुरु सेवा परिवार यांच्याकडून समस्त भाविकांनी याचा लाभ घ्यावा तसेच कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन करण्यात यावे मास्क सानीटायझर वापर करणे बंधन–कारक आहे असे आव्हान करण्यात आले आहे.

## उलवे नोडमधील हळदीकुंकू समारंभास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका भारतीय जनता पक्ष आणि उलवे नोड २ महिला मोर्चा कमिटीतर्फे हळदीकुंकू समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात सोमवारी झाला या समारंभाचे भाजप नेत्या शकुंतला रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन झाले, तर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्यासह अन्य मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. या वेळी महिलांसाठी विविध खेळ घेण्यात आले.

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्ससमोर झालेल्या हळदीकुंकू समारंभास या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, पं. स. सदस्य तथा महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, पनवेल महापालिकेच्या नगरसेविका सुशीला घरत, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, माजी सरपंच हौसाबाई कोळी, न्हावा ग्रामपंचायतीच्या उपसरपंच मंजुषा ठाकूर, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, तालुका सरचिटणीस प्रतिभा भोईर, लीना पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य गिरीजाबाई कातकरी, उलवे नोड २ अध्यक्ष योगिता भगत, उपाध्यक्ष सुजाता पाटील, कामिनी कोळी, मिना म्हात्रे, चिटणीस उषा देशमुख, रंजना पाटील, सुमन पाटील, शुभांगी पाटील, सिना वर्गिस, अर्चना मिश्रा, अनुसया घरत, नंदा ठाकूर, जयश्री देशमुख, अनिता ठाकूर, यमुनाबाई पाटील, इंद्रायणी कोळी, शोभा ठाकूर, कमलाबाई म्हात्रे, संगीता कोळी, संगीता म्हात्रे, धनवंती पाटील, इंदूमती म्हात्रे, आशा म्हात्रे, स्नेहलता ठाकूर, देवकीबाई ठाकूर, मनीषा घरत, शांताबाई ठाकूर, बानूबाई भगत, जयश्री कोळी, राधाबाई ठाकूर, सीमा भगत, राधा ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या समारंभात महिलांसाठी खेळ पैठणीचा, लकी ड्रॉ तसेच विविध खेळ आणि स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



## धारदार सुरीने वार करून केले जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

धारदार सुरीने वार करून जखमी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात नथुराम पाटील यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

करंजाडे येथील रणजीत लालजी कुर्मी हे आणि त्यांचा भाऊ क्रेनच्या पार्ट अल्टरनेटरचे काम करण्यासाठी गेले होते. यावेळी काम झाल्यानंतर टाकीच्या नळावर हात धुऊन लॉक करत असताना ओम साई धाबा हॉटेल मधील एक मुलगा त्यांच्याकडे आला व टाकीला लॉक का लावतो असे बोलून शिवीगाळ केली. यावेळी रणजीत यांचा भाऊ मंजित याला त्याने शिवीगाळ केली. त्यानंतर हॉटेलचे चालक नथुराम पाटील यांनी टाकीचा नळ तोडून टाकतो असे बोलून नळ तोडण्यास सुरुवात केली. त्यानंतर नथुराम पाटील यांनी शिवीगाळ करून हॉटेलमधील धारदार सुरीने रंजीत त्याच्या उजव्या हाताच्या करंगळीच्या बोटावर व बाजूला धारदार सुरीने वार केले. यात रणजीत जखमी झाला आहे.

## नागोठणे पोलिसांकडून गावठी दारूच्या चार हातभट्टी उध्वस्त : १३०० लिटर गुळमिश्रित रसायनही केले नष्ट

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे परिसरातील जंगलांचा फायदा उचलत फोफावत चाललेल्या गावठी दारु तयार करणाऱ्या हातभट्टींना नष्ट करण्याची मोहिम नागोठणे पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर यांनी हाती घेतली असून त्याचाच एक भाग म्हणून बुधवार दि. २३ फेब्रुवारी रोजी सकाळी नागोठणे पोलिस ठाण्याच्या हद्दितील चेराटी, काळकाई जंगल परिसरात धाड टाकून तेथील गावठी दारूच्या चार हातभट्टी उध्वस्त करण्याची मोहिम नागोठणे पोलिसांनी फत्ते केली आहे.



या कारवाईत प्लास्टिकचे १४ बॅरल व ४ लोखंडी टाक्या मिळून आल्या. त्यामधील ४० रुपये प्रतिलिटर प्रमाणे सुमारे ३०० लिटर गुळमिश्रित रसायन स्वरूपतील अंदाजे ५२ हजार रुपये किमतीचा हा मुद्देमाल वाहतुकीस अवजड व अवघड असल्याने नागोठणे पोलिसांच्या पथकाकडून जागीच पेटवून देण्यात येऊन जागेवरच नष्ट करण्यात आला आहे.

नागोठणे पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिस ठाण्यातील ठाणे अंमलदार व पोलिस पथकाने ही कौतुकास्पद कामगिरी केली आहे.

नागोठणे पोलिस ठाण्याच्या या पथकात पोलिस नाईक नितीन गायकवाड, पोलिस नाईक गंगाराम ढुमणे, महिला पो. ना. प्रतिक्षा गायकवाड, म.पो.ना नम्रता आयर, पो.कॉ. रामनाथ ठाकूर, पो.कॉ. अशिष पाटील, पो.कॉ. सत्यवान पिंगळे यांचा समावेश होता. नागोठण्याचे पो. नि. तानाजी नारनवर यांच्याकडून गावठी दारु विरोधात करण्यात आलेल्या या कारवाईचे नागरिकांतून स्वागत करण्यात येत आहे.

## अपघातात १७ वर्षीय मुलाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सेक्टर ६, नवीन पनवेल येथे मोटार सायकल स्लीप झाल्याने १७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. विवेक चंदेला असे मृत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विवेक चंदेला (१७) हा एम एच ४६ बिजी ०५३८ दुचाकी घेऊन टेम्भोडेकडे जाणाऱ्या रस्त्याकडे जात होता. नवीन पनवेल, सेक्टर ६ येथून जात असताना त्याची गाडी स्लीप झाली. यात त्याच्या छातीला, हनुवटीला, पायला जखम झाली. त्याला उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल **सौ.अनिता विजय ठाणगे,** रा.पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे / जमीन मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : सालपे, ता.कर्जत, जि.रायगड**

| भोगवटा धारकाचे नाव | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| मालती बाळकृष्ण कटेकर | १/५ | ०–३६–९०<br>०–०३–८०<br>एकूण ०–४०–७० | ३=०६ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक / भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच **सौ.मालती बाळकृष्ण कटेकर** यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर व्यवहाराबाबत वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षिस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यु. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसापर्यंत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर वर नमूद केलेला व्यवहार पूर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २३/०२/२०२२

**सही/–**
**ॲड.विनोद जी. ठाणगे**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**वकील व नोटरी**
**शॉप नं.१००, पनवेल म्युनिसिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, पनवेल, रायगड.**
**मो.नं.९३२४३४३५०६**



मा.गोडसे मॅडम कोर्ट

ॲड.सुनील मोरे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज ज्यु.डी.यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.२१३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०५/०४/२०२२

१) श्रीमती.राबिया खातून हिदायतुल्लाह खान
वय : ३३ वर्षे, धंदा : घरकाम
२) कुमारी.हुमेरा खातून हिदायतुल्लाह खान
वय : ११ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कुमार.अब्दुल्ला हिदायतुल्लाह खान
वय : ०६ वर्षे, धंदा : काहीही नाही
४) कुमार.अब्दुल रहेमान हिदायतुल्लाह खान
वय : १ वर्षे, धंदा : काहीही नाही
सर्व रा.यु एल–२, बिल्डींग नं.१४, रुम नं.४०३,
उन्नती सोसायटी, सेक्टर १९ उलवे, नवी मुंबई–४१०२०६
अर्जदार नं.२ ते ४ यांचे तर्फे अज्ञान
पालनकर्ती म्हणून अर्जदार नं.१
श्रीमती.राबिया खातुन हिदायतुल्लाह खान — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ हिचे पती, अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.हिदायतुल्लाह रहमतुल्लाह खान हे तारीख २३/०५/२०२१ रोजी हबीब हॉस्पिटल मुंबई येथील हॉस्पिटलमध्ये मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ हिची सासू व अर्जदार नं.२ ते ४ यांची आजी कै.जाहिदा रहमतुल्लाह खान या दि.१४/०९/१९९० रोजी मौजे : भदोखर ता.ईटवा, जि.सिद्धार्थनगर (उत्तरप्रदेश) २७२१९२ येथे राहत्या घरी मयत झालेले असून त्यांच्या मृत्यूची नोंद सरकारी कार्यालयात केलेली नाही. कै.हिदायतुल्लाह रहमतुल्लाह खान यांच्या नावाने सिडकोने अलाऊट केलेले असून खालील वर्णनाची मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टास अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको हद्दीतील, मास हौसिंग स्कीम (एल.आ.जी.), बिल्डींग नं.–एल–०१, अपार्टमेंट नं.१००३, दहावा मजला, सेक्टर–२७, तळोजा, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि. रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.पांडे साो. यांचे कोर्ट

ॲड.भुषण मो. म्हात्रे
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो.यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज नं.२३३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०४/०४/२०२२

श्री.बादल जयसिंग चौहान — अर्जदार
विरुद्ध
मा.आयुक्त साो
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै. जयसिंग मटुरलाल उर्फ मारुलाल चौहान हे अर्जदार यांचे नात्याने वडील असून ते दि.१५/०२/२०१२ रोजी मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. त्याअर्थी अर्जदार श्री.बादल जयसिंग चौहान यांनी जन्म–मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये कै.जयसिंग मटुरलाल उर्फ मारुलाल चौहान यांच्या मृत्यूची नोंद करून मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

सदरकामी कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.न्यायालय वरील अर्जदार यांच्या अर्जाकामी पुरावा घेण्याची जन्म–मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये कै.जयसिंग मटुरलाल उर्फ मारुलाल चौहान यांच्या मृत्यूची उशिरा नोंद करून मिळणेबाबतचा दाखल केलेला अर्ज मंजूर करील.

आज दि.२२३/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की, सदरहू मिळकत आमचे अशिल यांचे कुळहक्काची, वहिवाटीची व ताबेकब्जातील, शेतजमीन मिळकत मौजे : दिघोडे, ता.उरण, जि.रायगड येथील मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : दिघोडे, ता.उरण, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| दिघोडे | २३ | २ | ०–८७–००<br>पो.ख. ०–०१–५०<br>एकूण ०–८८–५० | १५.४४ |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदर मिळकत आमच्या अशिलांच्या वडिलोपार्जित मालकीची कुळवहिवाटीची कसवणुकीची मिळकत आहे. सदर मिळकतीत आमचे अशिल यांची वहिवाट, ताबेकब्जा व कसवणुक असून ते त्यातून दरसाल अंगमेहनतीने भाताचे उत्पन्न घेत आहेत. सदर मिळकतीचे आमचे अशिल मालक असल्याने सदर मिळकतीचा कुठल्याही प्रकारचा विक्री दान बक्षिस गहाण फरोक्त खत विकासाचा करार कुणीही केल्यास सदरचा कोणताही व्यवहार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही व त्यानंतर होणाऱ्या परिणामास सर्वस्वी जबाबदार वरील मिळकत घेणार राहतील याची नोंद घ्यावी.

कळावे,
ठिकाण : पनवेल
दिनांक : २३/०२/२०२२

**सही/–**
**ॲड.सुमीत अविनाश म्हात्रे**
**जय नारायण बिल्डींग, गाळा नं.४, राम गणेश गडकरी रोड, गावदेवी मंदिराच्या बाजूला, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**



मा.पांडे साो. यांचे कोर्ट

अर्जदारांचे वकील
ॲड.देवेंद्र बोंडरे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.११४०/२०२१
ने.ता.२८/०२/२०२२

श्री.रामदास हरिचंद्र पाटील — अर्जदार
विरुद्ध
मा.निबंधक जन्म व मृत्यू नोंदणी
पनवेल महानगरपालिका,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.रामदास हरिचंद्र पाटील यांनी त्यांचा मुलगा कु.वंश रामदास पाटील यांचा जन्म दि.२७/१०/२०१८ रोजी निल हॉस्पिटल, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झालेला आहे. तथापि सदर अर्जदार यांनी त्यांचा मुलगा कु.वंश रामदास पाटील हा दि.२७/१०/२०१८ रोजी नवीन पनवेल, ता.पनवेल, जिरायगड येथे जन्म झाल्याबाबत नोंद होवून मिळणेकरिता मे.न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. तथापि सदर अर्जास कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा या कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये व मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कारवाई करेल व ते अर्जदार यांचा मुलगा कु.वंश रामदास पाटील यांचे जन्मासंबंधी योग्य ते आदेश मंजूर करेल. आज दि.२४/०१/२०२२ रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

# संक्षिप्त...

## सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटर सायकलवरून आलेल्या ईसमानी ५३ वर्षीय महिलेच्या गळ्यातील ९५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने खेचुन नेले आहेत. चोरांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवीन पनवेल, सेकटर ८ येथील ज्योती संजय पाटील ह्याची दाढ दुखत असल्याने त्या आई मेडिकलमध्ये गोळी आणण्यासाठी गेल्या होत्या. त्या पायी परत येत असताना सोसायटीच्या गेटसमोर आल्यावर पाठीमागून मोटरसायकल वरून दोन अनोळखी ईसम आले. त्यांनी पाटील यांच्या गळ्यातील ९५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने खेचून ते शिवा कॉम्प्लेक्सच्या दिशेने पळून गेले.

## महिंद्रा पीकअप टेम्पोची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहराजवळील भारत ग्लास शोरुमच्या पाठीमागे व एस ग्लास गोडावूनच्या समोर मार्केट यार्ड जवळ उभी करून ठेवलेली दिड लाख रुपये किंमतीची महिंद्रा कंपनीची सफेद रंगाच्या पीकअप टेम्पोची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना घडली आहे.

गुलाम हुसेन चौधरी यांनी त्यांच्या ताब्यातील दिड लाख रुपये किंमतीचा एमएच-०४-जेसी-१७७९ हा सदर ठिकाणी उभा करून ठेवला असता अज्ञात चोरट्यांनी सदर टेम्पो चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## शिवसेनेने दिला मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेनेच्या ८०% समाजकारण व २०% राजकारण या धोरणाप्रमाणे जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांनी एका मुलाला व्हील चेअर देवून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या मार्गदर्शनाने कु. प्रवीण सरोज जैसवाल रा. कळंबोली यांना व्हील चेअर देण्यात आली. एक आधार असावा असे शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्यामार्फत नेहमी गोरगरिबांना मदतीचा हात दिला जातो. यावेळी शिवसेना विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर यांच्यासह इतर शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी जैसवाल कुटुंबियांनी शिवसेनेचे आभार मानले आहेत.



# नरवीर तानाजी मालुसरे शौर्यदिन आज तर उद्या पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन

## पद्मश्री डॉ. बावस्कर यांना यंदाचा नरवीर तान्हाजी मालुसरे शौर्य सेवा पुरस्कार

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नरवीर तानाजी मालुसरे समाधी परिसराच्या सुशोभिकरणासाठी महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत रायगडच्या पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांच्या पाठपुराव्याने ५ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर यंदा नरवीर तानाजी मालुसरे यांचा २५२ वा शौर्यदिन आज गुरूवार, दि. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी तर पुण्यतिथी सोहळा शुक्रवार दि.२५ फेब्रुवारी २०२२ रोजी आयोजित केला जात आहे. यंदाचा सुभेदार नरवीर तान्हाजी मालुसरे शौर्य सेवा पुरस्कार २०२२ पद्मश्री डॉ. हिंमतराव बावस्कर यांना



देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी आयोजक रायगड जिल्हा परिषद, पंचायत समिती पोलादपूर, नरवीर तानाजी मालुसरे उत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्ट, उमरठ यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात आली आहे.

गुरूवारी सकाळी पुतळ्याचे पुजन सुंदर कळंबे, ध्वजारोहण राम महाराज कळंबे यांच्याहस्ते झाल्यानंतर राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे आणि शिवकालीन खेडे या प्रतापगडाच्या पायथ्याशी उभारलेल्या संकल्पनेचे संचालक आप्पासाहेब उतेकर यांच्याहस्ते नरवीरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. दुपारी महिला सक्षमीकरणांतर्गत महिला मेळावा आणि हळदीकुंकू कार्यक्रम, तालुकास्तरीय खुल्या कबड्डी स्पर्धा, आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण व मार्गदर्शन तसेच कबड्डी स्पर्धांचे पुढील कार्यक्रम असे गुरूवारी दिवसभराचे कार्यक्रम होणार आहेत.

शुक्रवारी दि.२५ फेब्रुवारी २०२२ रोजी सुभेदार नरवीर तान्हाजी मालुसरे व शेलारमामा यांच्या समाधीला अभिषेक मनोहर कळंबे आणि संजय महाराज कळंबे यांच्याहस्ते तर पूजाविधी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे आणि युवासेना अध्यक्ष संजय कळंबे यांच्याहस्ते होणार आहे. ध्वजारोहण इंद्रजित कळंबे तर नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण जयराम मोरे यांच्याहस्ते केले जाणार आहे. सकाळी नरवीरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर पालखीची भव्य मिरवणूक निघून मर्दानी खेळाची प्रात्यक्षिके व शिवशाहिर वैभव घरत यांचा शाहिरी पोवाडा, नरवीर तानाजी मालुसरे रेस्क्यू अँड ॲडव्हेंचरचे उदघाटन आणि नैसर्गिक आपत्तीकाळात मदत केलेल्या संस्था व व्यक्तींचा सत्कार, प्रमुख पाहुण्यांचा सत्कार तसेच मान्यवरांचे मार्गदर्शन आदी कार्यक्रम होणार आहेत. याप्रसंगी पालकमंत्री ना.अदिती तटकरे, राजिप अध्यक्षा योगिता पारधी, खासदार सुनील तटकरे, आ.भरत गोगावले, राजिप उपाध्यक्ष सुधाकर घारे, जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, सभापती नंदा चांदे, उपसभापती शैलेश सलागरे, तहसिलदार दिप्ती देसाई तसेच अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## अग्नीशस्त्राची विक्री करण्यास आलेल्या दोन इसमांना कामोठे पोलीसांकडून अटक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

अग्नीशस्त्राची विक्री करण्यास आलेल्या दोघा इसमांना कामोठे पोलिसांनी ताब्यात घेतल्याने मोठी घटना टळली आहे.

कामोठे पोलीस ठाणे हद्दीत किया शोरुमजवळ, खांदा कॉलनी सिग्नल समोर, कामोठे, नवी मुंबई याठिकाणी अँक्टीव्हा स्कुटीवर २१ ते २२ वर्ष वयोगटातील दोन इसम पिस्टल विक्रीसाठी येणार असल्याची गुप्त बातमीदारामार्फत माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती स्मिता जाधव यांना प्राप्त झाल्याने त्यांनी कामोठे पोलीस ठाणेकडील पोउपनि कोठावळे, पोना कांबळे, पोशि चनेरलु व पोशि श्रीनामे व सोबत पंच असे पथकासह लागलीच नमुद ठिकाणी सापळा लावला असता संशयित आरोपी विश्वजीत गडदे (२१ रा.कामोठे) व आझाद हुसेन मोहम्मद समीम (२२ रा.सुकापूर) हे त्यांच्या ताब्यातील दुचाकीवरुन तेथे आले असता त्यांना ताब्यात घेवून त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे एक गावठी बनावटीचे अग्नीशस्त्र (पिस्टल) व मोबाईल फोन तसेच रोख रक्कम सापडली आहे. त्यानुसार त्यांना ताब्यात घेवून त्यांच्या विरुद्ध कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. सदर अग्नीशस्त्रे कोणाकडून आणली या संदर्भात कामोठे पोलीस अधिक शोध घेत आहेत.

## नाभिक समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध : आ.अनिकेत तटकरे

### समाज बांधवांनी घेतली आ.तटकरे यांची भेट

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

कोलाड येथील रायगड जिल्हा नाभिक समाजमंदिराचा एक आरसीसी हॉल व समाजमंदिर सुशोभीकरणासाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी रायगड जिल्हा नाभिक संघांचे विश्वस्त मार्गदर्शक भाई यांच्या नेतृत्वाखाली समाज बांधवांनी राष्ट्रवादीचे आमदार अनिकेतभाई तटकरे यांची सुतारवाडी येथील गीताबाग येथे भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. त्यानंतर आमदार तटकरे यांनी त्या निवेदनाची तत्काळ दखल घेऊन राजिपचे कनिष्ठ अभियंता शिंदे रावसाहेब यांना संबंधित कामाचे मापे घेऊन अंदाजपत्रक तयार करण्याचे आदेश दिले.



आमदार अनिकेतभाई तटकरे यांचे आदेश मिळताच शिंदे रावसाहेब यांनी तत्काळ कार्यवाहीस सुरवात केली. दरम्यान नाभिक समाज बांधवांनी आमदार तटकरे यांना निवेदन दिले त्यावेळी नाभिक समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध असून समाजातील विविध विकासकामांसाठी भरघोस निधी उपलब्ध करून देणार असल्याचे अभिवचन आमदार अनिकेतभाई तटकरे यांनी नाभिक समाज बांधवाना दिले. आमदार अनिकेतभाई तटकरे यांना कार्यतत्पर आमदार म्हणून का संबोधिले जाते याची पुन्हा प्रचिती यावेळी नाभिक समाज बांधवाना आली. दरम्यान यापूर्वी जिल्हा नाभिक समाज मंदिरासाठी खासदार सुनील तटकरे यांनी १५ लाख रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला होता.

आमदार तटकरे यांना विकासकामाविषयी निवेदन देतेवेळी भाई टके, जिल्हा नाभिक समाज संघांचे विश्वस्त बाळासाहेब टके, सल्लागार शामकांत नेरपगार, ज्येष्ठ समाज बांधव गजानन खराडे, नाभिक समाज तरुण संघांचे रोहा तालुका अध्यक्ष प्रविण उर्फ भाई पवार, एकनाथ मोहिते, किशोर खंडागळे, किरण खंडागळे, चंद्रकांत हुजरे, निलेश खंडागळे, राऊत गुरुजी, संदेश खराडे, उत्तम साळुंखे, जितेंद्र जाधव, केतन पवार, अशोक पवार, दिलीप मोहिते, वसंत खंडागळे, राजेंद्र शिंदे, बाळाराम पवार, विवेक मोरे, दिपक टके, निलेश पवार आदी नाभिक समाज बांधवांसह कुणबी मराठा समाजाचे नेते शिवरामभाऊ शिंदे उपस्थित होते.

# माथेरानमधील विद्यार्थी गिरवणार जापनीज भाषा शिकण्याचे धडे

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर आणि वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर या दोन्ही शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांना जपानी भाषा प्रशिक्षण वर्ग आज सुरू करण्यात आले.

माथेरान नगरपरिषदेचे माजी नगर-सेवक चंद्रकांत जाधव यांच्या सहकार्यातून मुलुंड येथील जपानी भाषा शिक्षिका विद्या जबलपूरवाला आणि मुर्तुझा जबलपूरवाला यांच्या माध्यमातून इयत्ता ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना जपानी भाषा प्रशिक्षण सुरू केले आहे.

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद या प्रशिक्षण वर्गाला मिळाला आहे. आठवड्यातून एक दिवस हा प्रशिक्षण वर्ग सुरू असणार आहे. आणखी काही दिवस हा उपक्रम सुरु असणार आहे.



या उपक्रमाचे उदघाटन दि. २२ फेब्रुवारी रोजी प्रा.शां.य.गव्हाणकर विद्यामंदिर या ठिकाणी संपन्न झाले. शाळेचे शिक्षक संघपाल वाठोरे यांनी सर्वांचे स्वागत करून वेगवेगळ्या भाषा शिकल्याने आपल्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल होतो असे सांगितले तर मुख्याध्यापिका कल्पना पाटील यांनी आपल्या विद्यार्थ्यांना जपानी भाषा शिकण्याची सुवर्णसंधी चालून आली आहे त्याचा लाभ घ्यावा असा विद्यार्थ्यांकडे आग्रह धरला. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण ढेबे यांनी विद्यार्थ्यांना मेहनतीने भाषा शिका, भाषे-तून करिअर घडवता येते असे सांगितले. या वेळी रमेश ढोले, दिलीप अहिरे, दिनेश बागवे, सचिन भोईर, अनिश पाटील, संतोष चाटसे, साक्षी कदम दोन्ही शाळांचे शिक्षक उपस्थित होते.

# सारळ डाक विभागातील निवृत्ती वेतनधारकांच्या समस्या निवारणासाठी पेन्शन डाक अदालतचे १८ मार्चला आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

डाक विभागाच्या कुटुंब निवृतीवेतनधारक व निवृत्ती वेतनधारकाच्या समस्या सोडवण्यासाठी पोस्टमास्टर जनरल, नवी मुंबई रिजन यांच्याद्वारे पेन्शन अदालत शुक्रवार, दि.१८ मार्च रोजी दुपारी १२.०० वाजता पोस्ट मास्टर जनरल, नवी मुंबई रिजन कार्यालय, २ रा मजला, पनवेल मुख्य पोस्ट ऑफिस इमारत, पनवेल, रायगड येथे आयोजित करण्यात आली आहे.

कोविड-१९ महामारीच्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे वयोमानाप्रमाणे स्वत:ची काळजी घेऊन पेन्शन अदालतीला प्रत्यक्ष उपस्थित राहणे टाळावे. यामध्ये निवृत्तीधारकांच्या वेतन व इतर लाभाशी संबधित तक्रारी तसेच जे टपाल विभागातून निवृत्त झाले आहेत, ज्यांचा सेवेत असताना मृत्यू झाला आहे, ज्यांना तीन महिन्याच्या आत निवृतीवेतनाची पूर्तता झालेली नाही अशा प्रकरणाचा या डाक अदालतीमध्ये निपटारा करण्यात येणार आहे.

तसेच न्यायालयात असणारी, कायदेशीर प्रलंबित असणारी प्रकरणे या अदालतीमध्ये समाविष्ट करता येऊ शकत नाहीत. त्याचप्रमाणे पेन्शनर असोसिएशनकडून आलेल्या प्रकरणावरही या अदालतीमध्ये निर्णय घेता येत नाही. अशी माहिती पोस्ट विभागाकडून देण्यात आली आहे.

तक्रारदाराने अर्ज करताना निवृत्तीधारकाचे नाव, हुद्दा, जिथे निवृत्त झाले त्या कार्यालयाचे नाव, निवृत्तीची तारीख, पीपीओ क्रमांक, जिथून पेन्शन घेतली जात आहे त्या पोस्ट ऑफिसचे नाव, पोस्टाचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, थोडक्यात तक्रार, पेन्शनकर्त्याची सही, दिनांक अशा पद्धतीने अर्ज करावा.

पोस्ट मास्टर जनरल, नवी मुंबई रिजन कार्यालय यांच्याकडून अशी अदालत प्रति वर्षी आयोजित केली जाते. या पेन्शन अदालतीचा हेतू पेन्शनधारकांच्या समस्या वेगवान व प्रभावी रीतीने विनाविलंब सोडविणे, हा आहे. या डाक अदालतीमधून डाक विभागाच्या निवृत्ती वेतनधारकांच्या समस्यांवर, तक्रारींवर तात्काळ निर्णय घेऊन तोडगा काढण्याला प्राधान्य दिले जाणार आहे. तक्रारदारांनी आपला अर्ज वर दिलेल्या माहितीनुसार वरिष्ठ लेखा अधिकारी, पोस्ट मास्टर जनरल, नवी मुंबई रिजन कार्यालय, २ रा मजला, पनवेल मुख्य पोस्ट ऑफिस इमारत, पनवेल, रायगड - ४१०२०६ या पत्त्यावर दि.२८ फेब्रुवारी पर्यंत मिळतील, अशा रीतीने पाठवावेत. त्यानंतर आलेल्या प्रकरणाचा अंतर्भाव या डाक अदालतीमध्ये केला जाणार नाही. संबधित गरजू व्यक्तींनी या अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन रायगड जिल्हा डाक अधीक्षक श्री.अविनाश पाखरे यांनी केले आहे.

# दिव्यांग व्यक्तींनी महा-शरद वेब पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन : डॉ.किरण पाटील

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २ (झेडसी) अन्वये दिलेल्या परिशिष्टामध्ये दिव्यांगत्त्वाचे २१ प्रकार आ-हेत. दिव्यांग व्यक्तींना त्यांचे जीवन जगणे सुलभ व्हावे, यासाठी विविध सहाय्यक उपकरणांची आवश्यकता असते. जेणेकरून ते त्यांच्या दिव्यांगत्वावर मात करू शकतील व जनसामान्यांप्रमाणे जीवन जगू शकतील. त्यांना दिव्यांगत्वावर मात करण्यासाठी कोणत्या सहाय्यक उपकरणांची आवश्यकता आहे, हे जाणून घेण्यासाठी आवश्यक ती वैद्यकीय चाचणी करून घेणे व त्या आधारे सहाय्यक उपकरणे निश्चित करणे आवश्यक असते.

समाजातील दानशूर व्यक्ती, सामाजिक व सेवाभावी संघटना या दिव्यांगांना सुगम्यता प्राप्त करून देण्यासाठी आवश्यक सहाय्यक साधनांचा पुरवठा करू इच्छितात. त्यासाठी दानशूर व्यक्ती व दिव्यांग लाभार्थी यांच्यामध्ये दुवा साधला जाण्यासाठी तसेच दिव्यांग व्यक्तींमध्ये जनजागृती करून त्यांची माहिती उपलब्ध करण्याच्या उद्देशाने सामाजिक न्याय व विशेष न्याय विभागाने महा-शरद वेब पोर्टल वर नोंदणी करण्याचे अभियान सुरू केलेले आहे.

याकरिता दिव्यांग व्यक्ती तसेच दिव्यांग व्यक्तींना सहाय्य करू इच्छिणाऱ्या दानशूर व्यक्ती, सामाजिक व सेवाभावी संघटनांची नोंदणी www.mahasharad.in या संकेतस्थळावर नोंदणी करणे गरजेचे आहे. याकरिता दिव्यांग व्यक्तींकडे केंद्र शासनाच्या वैश्विक ओळखपत्र प्रणालीअंतर्गत (UDID & Card) असणे आवश्यक आहे. तसेच त्या व्यक्ती आणि सामाजिक सेवाभावी संस्थाकडून या प्रणालीव्दारे मदत करण्यात येईल, त्यांना आयकरामध्ये ८०-जी अंतर्गत सूट असेल.

तरी जास्तीत जास्त दिव्यांग व्यक्ती व दानशूर व्यक्ती आणि सामाजिक सेवाभावी संस्थांनी www.mahasharad.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# कोकणातील सह्याद्री पर्वताच्या पट्ट्यात पश्चिम महाराष्ट्रातील मेंढपाळ दाखल

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

धनगर समाज हा बहुतांश ठिकाणी स्थिरावला असला तरी आजही मेंढपाळ गावोगावी आपला कबिला घेऊन भटकंती करताना दिसतोय. कोकणात पर्जन्यवृष्टी चे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे मान्सूनचा पाऊस सुरू होताच कोकणातील मेंढपाळ परतीच्या प्रवासाला लागतात. मात्र पावसाचा जोर कमी होताच साधारणतः ऑक्टोबर -नोव्हेंबर ते पुढे जानेवारी - फेब्रुवारी महिन्यात पश्चिम महाराष्ट्रातील मेंढपाळ कोकणातील सह्याद्री पर्वताच्या पट्ट्यात दाखल होताना दिसतात. आज सर्वत्र मेंढपाळ व त्यांचे तांडे नजरेस पडत आहेत.

पाली खोपोली राज्य महामार्ग, पेण अलिबाग मार्गे, तसेच मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर आता शेळ्या व मेंढ्यांचे जथ्ये दिसु लागले आहेत. कोकणात पूर्वीपासून चालत आलेली शेतात शेळ्या मेंढ्या बसविण्याची कारवणी पद्धत आजही आपले अस्तित्व टिकवून असल्याचे दिसते. कारवणी पद्धत मेंढ पाळांना जगवतेय हेच खरे. कोकणातील पूर्वपरंपरागत प्रथा आजही जिवंत आहे. पूर्वमशागतीसाठी पूर्वीच्या काळी रासायनिक खते नसल्याने शेतकरी सेंद्रिय पद्धतीने शेतीची मशागत करत असत. अशातच हिवाळ्यात मेंढपाळ आपल्या शेळ्या मेंढ्यांचा मोठा फौजफाटा घेऊन आल्यावर



या भटकंतीत दिवसा रात्री आपले बिऱ्हाड एखाद्या शेतात घेऊन बसतात. अशात या शेळ्या मेंढ्याचे मूलमूत्र शेतात पडून शेतीची सुपीकता वाढण्यास मदत होते. ही पद्धत कारवणी पद्धत म्हणून आजही ओळखली जाते. या लेंडीखताला मोठी मागणी असते. फळबागांना देखील हे खत अधिक उपयुक्त ठरते. शेत जमीन अधिक कसदार होऊन उत्पादनात वाढ व्हावी याकरिता शेतकरी मेंढपाळांना दरवर्षी स्वतःहून बोलवून घेतात. मेंढपाळांना याकरिता प्रचंड मेहनत घ्यावी लागते. ऊन, वारा, वादळ, थंडी , पाऊस याची तमा न बाळगता मेंढपाळ आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी व जनावरे वाचविण्यासाठी आटापिटा करताना दिसतो. या भटकंतीत एका मेंढपाळकडे साधारणतः २०० ते २५० मेंढ्या असतात. मेंढपाळांना या कळपासोबत च आपला संसार थाटावा लागतो.अनेकदा वाढत्या आजारात मेंढ्या दगावतात, त्यामुळे कवडीमोल दराने शेळ्या मेंढ्या विकण्याची वेळ धनगर बांधवावर येते. सर्वच्या सर्व मेंढ्या विकाव्या लागू नयेत म्हणून त्यांच्यावर स्तलांतराची वेळ येते. या कळपात शिकारी कुत्रे , घोडे, कोंबड्या यांचा देखील समावेश असतो. लहान मुलांना घोड्यावर बसवून ही सवारी थाटात जाताना आता सर्वत्र दिसू लागली आहे. या मेंढ्या जपणे खूप मोठ्या जबाबदारीचे काम असते. महामार्गावरून वेगवान वाहनांच्या धडकेत कळपातील अनेक शेळ्या मेंढ्या मृत्युमुखी पडत असतात. पाऊस पडेपर्यंत मेंढपाळ भटकंती करत असतात. त्यामुळे शेळ्या मेंढ्यांच्या चाऱ्याचा प्रश्न मार्गी लागतो असे यावेळी बोलताना मेंढपाळाने सांगितले. कारवणी पध्दतीत एका रात्रीसाठी शेळ्या मेंढ्या शेतात बसवल्याने शेतकर्यांकडून तांदूळ व पैसे बिदागी म्हणून दिली जाते. यातून मेंढपाळ आपला उदरनिर्वाह साधत असतो. पोटाची खळगी भरण्यासाठी धावणाऱ्या या मेंढपाळांचे जीवन हलाखीचे व कष्टप्रद असतेच, शिवाय या भटकंतीत त्यांच्या लहान लहान चिमुरड्यांना शिक्षण मिळत नसल्याने त्यांचे भवितव्य अंधारमय होते हे देखील तितकेच खरे. सरकारने मेंढपाळ यांना विविध योजनांचा लाभ द्यावा, त्यांच्या मुलांच्या भवितव्यासाठी विशेष तरतूद करावी अशी मागणी होताना दिसत आहे.